| MHOS150004592026 | **दि. किरकोळ अर्ज क्र. ४२/२०२६**<br>छबु भगवान मोरे वि. कोणी नाही |
|---|---|

## निशाणी क्र.१ खालील अंतिम आदेश

अर्जदारांनी बॉम्बे रेग्युलेशन VIII, १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळण्याकरिता प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. अर्जदारांचे असे कथन आहे की, मयत भगवान तुळशीराम मोरे(सुतार) यांचे वारस पुढील प्रमाणे–

| **अ. क्र.** | **अर्जदारांचे नाव** | **अर्जदाराचे मयताशी नाते** |
|---|---|---|
| १. | छबु भगवान मोरे | पत्नी |
| २. | अशोक भगवान मोरे | मुलगा |
| ३. | अरुण भगवान मोरे | मुलगा |
| ४. | हनुमंत भगवान मोरे | मुलगा |
| ५. | जनाबाई शहाजी सुतार | मुलगी |

२. मयत भगवान तुळशीराम मोरे(सुतार), हे दिनांक २६.०६.२०२५ रोजी मौजे घारगांव, ता.परंडा येथे मयत झाले आहेत. मयत भगवान तुळशीराम मोरे(सुतार) यांच्या मृत्यूनंतर अर्जदार क्र. १ ते ५ यांना आवश्यक शासकिय कामासाठी वारस दाखल्याची आवश्यकता आहे. अर्जदार हे मयत भगवान तुळशीराम मोरे(सुतार) यांचे वारस असून त्यांच्या व्यतिरिक्त इतर कोणीही वरील मयतास कायदेशीर वारस नाहीत, म्हणून त्यांच्या नावे वारस प्रमाणपत्र निर्गमित करण्यासाठी सदरचा अर्ज अर्जदारांनी दाखल केलेला आहे.

३. अर्जाच्या पृष्ठ्यर्थ अर्जातील कथनांच्या समर्थनार्थ व त्यातील कथने सिध्द करण्याकरीता अर्जदार क्र. २ यांनी **(नि.क्र.११)** वर पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दाखल करुन त्यात अर्जाप्रमाणेच सविस्तर कथन केले. तसेच अर्जदारातर्फे साक्षीदार क्र. २ नागनाथ व्यंकट ढगे

यांनी **नि. क्र. १९** वर प्रतिज्ञापत्र दिले आहे. तसेच मयत भगवान तुळशीराम मोरे(सुतार) यांच्या मृत्यू प्रमाणपत्राची मुळ प्रत **(नि.क्र.१२)**, सरपंच, ग्रामपंचायत कार्यालय घारगांव, ता. परंडा यांनी दिलेले वारसाचे प्रमाणपत्र **(निशाणी क्र. १३)**, अर्जदारांनी आधार कार्डच्या छायांकित प्रती दाखल केल्या असुन त्यास अनुक्रमे **निशाणी क्र. १४ ते १८** देण्यात आले. जाहिरनामा **(नि.क्र.०५)** वर दाखल करण्यात आला आहे. निशाणी क्र. ०१ वरील आदेशानुसार लोकांकडून हरकती मागविण्यासाठीची आदेशिकावाहक मार्फत जाहीर नोटीस **(नि.क्र.०६)**काढण्यात आली. तसेच नोटीस दिनांक ११.०६.२०२६ रोजीचे वृत्तपत्र 'दैनिक संघर्ष' मध्ये प्रसिध्द करण्यात आली, परंतु कोणत्याही व्यक्तीकडून आजपावेतो हरकत प्राप्त झालेली नाही. अर्जदाराने नि. क्र. २० वर पुरावा बंदची पुरसीस दिली आहे.

**४.** आजपावेतो कोणत्याही व्यक्तीकडून हरकत प्राप्त न झाल्याने, अर्जातील कथनांच्या समर्थनार्थ अभिलेखावर दाखल केलेली कागदपत्रे व प्रतिज्ञापत्राच्या आधारे अर्जदार क्र. १ ते ५ हे मयत भगवान तुळशीराम मोरे(सुतार) यांचे कायदेशीर वारस आहेत असे ठरविणे संयुक्तिक होईल. करिता सदरचे वारस प्रमाणपत्र अर्जदाराच्या कथनाच्या आधारे देण्यात येत असून त्यातील मजकुर खोटा आढळल्यास अर्जदार हे स्वतः जबाबदार राहतील. सबब, खालील अंतिम आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. अर्जदार क्र.१ ते ५ यांना मयत भगवान तुळशीराम मोरे(सुतार) यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र निर्गमित करण्यात यावे.

३. वारस प्रमाणपत्र निर्गमित करण्याकरिता अर्जदार यांनी योग्य ती कोर्ट फी न्यायालयात जमा करावी.

Digitally signed by DILIP GANGADHAR JAGTAP
Date: 2026.08.17 15:50:56 +0530

(दिलीप गं. जगताप)
सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, परंडा

दिनांकः –१७/०८/२०२६

दि. किरकोळ अर्ज क्र. ४२/२०२६
छबु वि. कोणी नाही

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. File Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Smt. P. R. Barangule |
| Name of Court | Shri. Dilip G. Jagtap, Jt. C.J.J.D. and J.M.F.C., Paranda |
| Date of Dictation | 17/08/2026 |
| Judgment signed by the P.O. on | 17/08/2026 |
| Judgment/Order uploaded on | 17/08/2026 |